● गुरुवार, दि. २८ नोव्हेंबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक १२० वा ● किमंत २ रुपये ● पाने ४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## शिवरायांनी स्वराज्याची शपथ घेतलेल्या रायरेश्वर मंदिराचा जिर्णोद्धार करावा-सूर्यवंशी

**जालना । प्रतिनिधी -** छत्रपती श्री शिवाजी महाराज यांनी स्वराज्याची शपथ घेतलेल्या

किल्ले रायरेश्वर येथील श्री रायरेश्वर मंदिराचा जिर्णोद्धार करून सदर क्षेत्र तीर्थक्षेत्र घोषित करण्यात यावे, अशी मागणी अखिल भारत हिंदू महासभेचे प्रदेश संघटन मंत्री धनसिंह सूर्यवंशी यांनी एका निवेदनाद्वारे मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.



धनसिंह सूर्यवंशी यांनी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना पाठविलेल्या निवेदनात म्हटले आहे की, छत्रपती श्री शिवाजी महाराजांच्या स्वराज्याच्या प्रयत्नांमुळे भारत देशाचे आजचे अस्तित्व हे आपल्याला लाभले आहे व महाराष्ट्र राज्यातील संस्कृतीदेखील आज छत्रपती श्री शिवाजी महाराजांच्या कृपेने आपल्याला सुरक्षित लाभली आहे. या हिंदवी स्वराज्याच्या निर्मितीची शपथ महाराजांनी ज्या रायरेश्वर मंदिरात घेतली, ते समस्त भारतवर्षाचे एक पवित्र तीर्थस्थान आहे आणि सदर स्थानाचे महत्व जपणे हे शासनासह जनतेचे आद्यकर्तव्य आहे. तुर्तास सदर ठिकाणाची व्यवस्था ही छत्रपती श्री शिवाजी महाराज यांच्या नावलौकिकास साजेशी राखण्यात यश आलेले नाही. त्यामुळे श्री रायरेश्वर मंदीर क्षेत्र हे तीर्थक्षेत्र घोषित करण्यात यावे, तेथील मंदिराचा भव्यदिव्य स्वरुपात जीर्णोध्दार तसेच आसपास भाविकांसाठी सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्या व छत्रपती श्री शिवाजी महाराज यांच्या शपथ सोहळ्याचे भव्य शिल्प निर्माण करण्यात यावे, अशी मागणी श्री. सूर्यवंशी यांनी या निवेदनात केली आहे.



**शनी मंदिर चौकात वाहतुकीचा नेहेमीच खोळंबा होत असून या ठिकाणी अर्धा-अर्धा तास तर कधी एक- एक तास वाहनधारकांना ताटकळत बसावे लागत आहे. याकडे लक्ष देण्याची मागणी होती आहे. (छायाचित्र - किरण खानापुरे)**



**महायुतीच्या विजयाचे शिल्पकार भाजपा महाराष्ट्र संयोजक माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांची भेट घेऊन त्यांचा सत्कार करतांना राजेश राऊत, संजय देठे, प्रशांत गाडे, नरेश जयस्वाल आदी.**

### राष्ट्रीय युवा महोत्सव २०२५

## 'विकसित भारत यंग लीडर्स डायलॉग' चर्चासत्रात सहभागाचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** भारत सरकारने 'विकसित भारत युवा नेते संवाद' म्हणून राष्ट्रीय युवा महोत्सव २०२५ आयोजित करण्याचा निर्णय घेतला आहे. या दरम्यान देशभरातून निवडलेले ३ हजार तरुण-तरुणी १२ ते १३ जानेवारी २०२५ रोजी नवी दिल्ली येथे पंतप्रधानांसमोर विकसित भारताचे त्यांचे व्हिजन मांडतील आणि सादर करतील. तरी जालना जिल्ह्यातील सर्व तरुणांनी राष्ट्रीय युवा महोत्सव २०२५ विकसीत भारत यंग लीडर्स डायलॉगमध्ये जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन नेहरु युवा केंद्राचे जिल्हा युवा अधिकारी प्रणीत सांगवीकर यांनी केले आहे.

चर्चासत्र काळात तरुणांना देश-विदेशातील तरुण आयकॉन्सशी चर्चा करण्याची आणि शिकण्याच्या अनेक संधी मिळणार आहेत. कार्यक्रमाचा उद्देश देशभरातील तरुण नेतृत्व प्रतिभेचा शोध घेणे आणि त्यांचे संगोपन करणे, विकसित भारताची त्यांची दृष्टी स्पष्ट करण्यासाठी तरुणांना एक प्रभावी व्यासपीठ उपलब्ध करून देणे, त्यांना सर्वोच्च निर्णय घेणारे आणि प्रसिद्ध जागतिक आणि राष्ट्रीय व्यक्तिमत्त्वांशी जोडणे आणि विकसित भारताचे नेतृत्व करण्यासाठी तरुणांना सक्षम करणे, असा आहे. विकसित भारत यंग लीडर्स चर्चासत्रच्या माध्यमातून या तरुणांची चार टप्प्यांत निवड केली जाणार आहे. पहिल्या टप्प्यात, विकास भारत प्रश्नमंजुषा ऑनलाइन पद्धतीने आयोजित केली जाईल, ज्यामध्ये १५ ते २९ वर्षे वयोगटातील युवक पोर्टलवर नोंदणी करून भाग घेऊ शकतात. पहिल्या टप्प्यात निवडलेले तरुण दुसऱ्या टप्प्यातील विकास भारत ब्लॉग, निबंध स्पर्धेत सहभागी होतील. या टप्प्यातील निवडक युवक तिसऱ्या टप्प्यातील विकसित भारत राष्ट्रीय पिच डेक-स्टेट चॅम्पियनशिपमध्ये सहभागी होतील आणि तिसऱ्या टप्प्यातील विजेते अंतिम टप्प्यातील विकसित भारत राष्ट्रीय चॅम्पियनशिपमध्ये सहभागी होतील. पहिला टप्पा २५ नोव्हेंबर ते ५ डिसेंबर या कालावधीत भारत सरकारच्या पोर्टलवर आयोजित केला जाईल. असेही प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

युवा आदर्श

आभार ...

अनपेक्षित हार पदरी
कोसळून गेला उभार
मुरब्बी राजकारणी
माने जनतेचे आभार
पत टिकवूनि धरावी
मातीत पेरणी दुबार
तण काढून टाक दूर
भले पेरायचे तिबार
गुप्तभेटावे अंधारात
भरवावे बडे दरबार
साशंक गोंधळी मने
कुणा करावा एतबार
खलबते गलबते सुरू
शोधा दमदार आधार
यंत्रणासारी बिघडली
दाटवे संशयी अंधार
एन केन प्रकारे पहा
मिळो पुन्हा जनाधार
शक्तिवीण जनतेच्या
उत्तुंग इमले निराधार
सहानुभूती वृध्दीकरी
सुरु अत्यंत धार धार
लाट उसळता त्वेषाने
स्थिती होई असरदार
रे चाणाक्षपक्ष श्रेष्ठीचे
निभवा छान किरदार
आपण होऊ मालक
दुजे होती किरायादार

हेमंत मुसरीफ पुणे
9730306996.

## जालना कबड्डी असोसिएशन निवड चाचणी स्पर्धा

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र राज्य कुमार व कुमारी गट (मुले, मुली) च्या स्पर्धा डिसेंबर मध्ये घेण्याचे महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनने निश्चित केले आहे. या स्पर्धे साठी जालना जिल्ह्याचा कबड्डी संघाचे मुले व मुली संघ निवडण्यासाठी निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे.

या निवड चाचणीसाठ दि. ०१/०१/२००५ त्यानंतर जन्मलेले खेळाडू असावे असा निकष पूर्ण करणाऱ्या खेळाडूंना स्पर्धे मध्ये सहभाग घेता येईल. स्पर्धेसाठी आवश्यक आधार कार्ड, जन्म ाचा दाखला (शाळेचा दाखला). याशिवाय खेळाडूंना स्पर्धेमध्ये भाग घेता येणार नाही. तरी सर्व संघाच्या व्यवस्थापकांनी आपल्या संघाची नोंदणी दिनांक गुरूवार २८ नोव्हेंबर



२०२४ पर्यंत खालील संयोजकांशी संपर्क करून नाव नोंदणी करावी संजय येळवंतेः ९४२१६ ५४२१६, राहुल वाहूळे : ९८२३५ ५५८०२,

पान २ वर

## पक्षविरोधी काम केल्यामुळे काँग्रेस शहराध्यक्षांची हकालपट्टी करा

### नाना पटोले यांच्याकडे ई-मेल द्वारे मागणी

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्रात नुकत्याच विधानसभेच्या निवडणुका पार पडल्या असून जालना मतदारसंघांमध्ये काँग्रेस पक्षाचे जालना जिल्हा शहराध्यक्ष शेख महमूद यांनी पक्षविरोधी कार्य केल्यामुळे त्यांची पक्षातून हकालपट्टी करण्याची मागणी आज दिनांक २७ बुधवार रोजी दुपारी एक वाजेच्या सुमारास जालना येथून ई-मेल द्वारे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांना काँग्रेस पदाधिकाऱ्यांच्या वतीने पाठवण्यात आले आहे. दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की जालना विधानसभा मतदारसंघांमध्ये काँग्रेसचे महानगर जिल्हा शहराध्यक्ष शेख मेहमूद यांनी पक्षविरोधी काम करून आमदार कैलास गोरंट्याल यांच्या विरोधात अपक्ष उमेदवार उभे



केले तसेच काँग्रेस पक्षाच्या कोणत्याही प्रचार सभेस किंवा बैठकीस उपस्थित न राहता काँग्रेस पक्षाला अडचणीत आणणारे तसेच गोरंट्याल यांच्या पराभवास कारणीभूत ठरणारे कार्य केल्यामुळे शेख मेहमूद यांना तात्काळ पक्षातून हकालपट्टी करण्यात यावी अशी दिलेल्या

पान २ वर

## जालना जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाठी लोणीकरांना मंत्रिमंडळात स्थान देऊन जिल्ह्याचे पालकत्व मिळावे

### जालना जिल्ह्यातील सामान्य नागरिकांची भावना

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र राज्यातील गावा गावातील करोडो महिला पुरुष वृद्ध दिव्यांग युवक युवती विद्यार्थी बालक गावाबाहेर रस्त्याच्या कडेला शौचालयास जात होती. प्रचंड किळसवाणी घाण राज्यातील प्रत्येक गावाच्या सुरुवातीलाच आढळून यायची. या अतिशय घाण प्रकारामुळे राज्यभरात नेहमीच आजाराची साथ कायम असायची. राज्यभरात पसरलेल्या घाणीच्या साम्राज्यामुळे नेहमीच होत असलेल्या आजारामुळे राज्यातील हजारो नागरिकांचा बळी महिन्याकाठी जात होता. राज्यभरातली दवाखाने तुडुंब भरलेली असायची.

परंतु २०१४ ला महायुतीची सत्ता महाराष्ट्रात येताच महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाची सूत्रे देवेंद्रजी फडणवीस यांच्या हाती येताच त्यांनी पाणीपुरवठा व स्वच्छता खात्याची जबाबदारी आमदार बबनराव लोणीकर यांच्यावर सोपविली. आमदार बबनराव लोणीकर यांनीही मिळालेल्या संधीचं सोनं करत मूर्त अवस्थेत पडलेल्या पाणीपुरवठा व स्वच्छता खात्याला नव संजीवनी देण्याचे काम करत महाराष्ट्र राज्यात सुमारे एक कोटी स्वच्छतागृह बांधण्या करिता प्रति स्वच्छता ग्रह सुमारे १२००० रुपये निधी अनुदान प्रति लाभार्थ्यांना दिल. यामुळे महाराष्ट्र राज्याला हागणदारी मुक्त करण्याचं श्रेय जातो ते तत्कालीन पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री नामदार बबनराव लोणीकर यांना. महाराष्ट्र राज्याला हागणदारीमुक्त करण्याबरोबरच त्यांनी महाराष्ट्र राज्यातील गोरगरीब जनतेला पिण्याचे शुद्ध पाणी मिळाव आरोग्याच्या दृष्टिकोनातून राज्यभरात ही संकल्पना राबवण्यात त्याकाळी खूप महत्त्वाचं होत. राज्यभरात पसरलेलं घाणीचं साम्राज्य आणि राज्यभरातील नागरिकांना पिण्याचे अशुद्ध पाणी यामुळे उद्भवणाऱ्या नेहमीच्या आजाराच्या साथी ला कायमचं बंद करण्याकरिता तत्कालीन पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री नामदार बबनराव लोणीकर यांनी राज्यभरात मराठवाडा वॉटर ग्रीड नावाची योजना राबविण्याच धोरण आखल याकरिता त्यांनी विदेशात जाऊन अनेक देशात त्यांनी तत्कालीन तज्ञ अधिकारी वर्गासह अभ्यास दौरा आयोजित केला. राज्यभरातील खेड्यापाड्यातील गावगाड्यातील तांडेवाड्या वस्तीवरील आणि खेड्यापाड्यातील शाळात महाविद्यालयात व शासकीय कार्यालयासह मुला-मुलींच्या वस्तीगृहात शुद्ध पिण्याचे पाणी पोहोचविण्याचा हेतू ठेवून. राज्यभरात मराठवाडा वाटर ग्रीड ही महत्त्वाकांक्षी योजना त्यांनी राबविली. राज्यभरातल्या सर्वच शहरात तत्कालीन पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री नामदार बबनराव लोणीकर यांच्या संकल्पनेतून शुद्ध पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होऊ लागला. हळूहळू या योजनेचा व्यापक विस्तार होऊन राज्यभरातल्या अनेक तालुक्यात ही योजना यशस्वीपणे राबवली गेली. तत्कालीन पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री नामदार बबनराव लोणीकर यांच्या खांद्यावर पडलेली जबाबदारी त्यांनी अत्यंत अभ्यासपूर्ण यशस्वीपणे सांभाळली.



यावरोबरच परतुर विधानसभा मतदारसंघाचा सर्वांगीण विकास करण्याच्या उद्देशाने आमदार लोणीकरांनी तत्कालीन पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री पदाच्या कार्यकाळात सुमारे ४००० कोटी रुपये निधी मतदार संघात आणून परतुर विधानसभा मतदारसंघातील परतुर शहरात रेल्वेचा भव्य उड्डाणपूल, क्रीडा संकुल, स्वर्गीय भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी नाट्यगृह, वंदनीय विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलींचे वस्तीग्रह, तालुका व जिल्हा सत्र न्यायालयाची परतुर शहरातील भव्य देखणी इमारत, परतुर शहरातील उपजिल्हा रुग्णालय, नगरपालिकेची इमारत याबरोबरच परतूर शहरात शेकडो अद्यावत स्मशानभूमी बांधण्याबरोबरच परतूर शहरातील गल्लोगल्लीत सिमेंटचे रस्ते बांधकाम या निधीतून पूर्ण झाले असून उर्वरित कामे पूर्णत्वास जात आहेत. यासह मंठा शहरातही कोर्टाची भव्य देखणी इमारत, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलींचे वस्तीग्रह, देवी रोड बांधण्याबरोबरच मंठा शहरातील पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न आमदार लोणीकर यांनी राज्य सरकारच्या माध्यमातून आणलेल्या निधीतून सुटला असून मतदारसंघातही तत्कालीन पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री नामदार बबनराव लोणीकर यांच्या संकल्पनेतून शेगाव ते पंढरपूर दिंडी महामार्ग अनेक जिल्हा मार्ग महामार्ग व गावागावाला जोडणारे सार्वजनिक बांधकाम विभागाचे दर्जेदार मजबूत टिकाऊ रस्ते परतूर विधानसभा मतदारसंघातील गावागावात पहावयास मिळत आहे.

वैयक्तिक लाभाच्या योजनेतही राज्यभरात परतुर विधानसभा मतदारसंघ अव्वल आहेच असं म्हणणं वावगं ठरणार नाही कारण परतुर विधानसभा मतदारसंघात गेल्या वर्षभरात पंतप्रधान आवास योजना, मोदी आवास योजना, रमाई आवास योजना, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर

पान २ वर


# संपादकीय पान

## ... इतके अनर्थ एका अविद्येने केले

भारताचे थोर सुपुत्र, विचारवंत, समाजसुधारक, लेखक महात्मा जोतीराव फुले यांचा आज स्मृतिदिन. महात्मा जोतीराव फुले यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी झाला. जोतीरावांच्या वडिलांचे नाव गोविंदराव तर आईचे नाव चिमणाबाई असे होते. सातारा जिल्ह्यातील कटगुण हे त्यांचे मूळ गाव. त्यांचे आडनाव गोऱ्हे असे होते पण त्यांच्या वडिलांचा फुले विक्रीचा व्यवसाय होता त्यामुळे ते फुले म्हणूनच ते ओळखले जाऊ लागले पुढे फुले हेच आडनाव रूढ झाले. काही दिवसांनी कटगुणहुन त्यांचे कुटुंबीय पुरंदर तालुक्यातील खानवडी येथे आले. खानवडी येथे त्यांचे घर असून त्यांच्या नावे सात बाराचा उतारा देखील आहे. प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी भाजी विक्रीचा व्यवसाय केला. जोतीराव फुले यांना लहानपणापासून शिक्षणाची आवड होती. १८४२ साली त्यांनी पुण्याच्या स्कॉटिश मिशन हायस्कूलमध्ये माध्यमिक शिक्षण घेण्यासाठी प्रवेश घेतला. अतिशय तल्लख बुद्धीच्या जोतिरावांनी पाच सहा वर्षातच तो अभ्यासक्रम पूर्ण केला. २३ सप्टेंबर १८७३ रोजी महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. तथाकथित सनातनी उच्चवर्णीय लोकांकडून सर्वसामान्य लोकांवर होणारा अन्याय अत्याचार दूर करणे तसेच गुलामगिरीतून शूद्रातिशूद्र समाजाची मुक्तता करणे व त्यांना त्यांच्या हक्काची जाणीव करुन देणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. 'सर्वसाक्षी जगतप्ती। त्याला नकोच मध्यस्ती।।' हे या समाजाचे घोषवाक्य होते. सत्यशोधक समाजाने गुलामगिरीविरुद्ध आवाज उठवला आणि समाज न्यायाची व सामाजिक पुनर्रचनेची मागणी केली. या समाजातर्फे पुरोहितांशीवाय लग्न लावण्यास सुरवात केली. मराठीत मंगलाष्टके रचली. समाजातील तळागाळातील लोकांपर्यंत शिक्षण पोहचवणे हे सत्यशोधक समाजाचे महत्वाचे ध्येय होते. महात्मा फुले यांनी एका कवितेत शिक्षणाचे महत्व पटवून देताना म्हटले आहे की

**विद्येविना मती गेली ।**
**मतिविना नीती गेली।**
**नितीविना गती गेली ।**
**गतिविना वित्त गेले ।**
**वित्ताविना शूद्र खचले ।**
**इतके अनर्थ एका अविद्येने केले ।।**

एक महिला शिकली तर संपूर्ण कुटुंब शिकते. समाज शिक्षित करायचा असेल आणि बहुजन समाजात शिक्षण मुहूर्तमेढ रोवयची असेल तर महिलांना शिक्षित व्हायलाच हवे असे त्यांचे मत होणे म्हणूनच त्यांनी त्याची सुरवात स्वतःच्या घरापासून केली. जोतिरावांनी त्यांच्या पत्नी सावित्रीबाईंना शिक्षण देऊन शिक्षण कार्यास प्रवृत्त केले. महात्मा फुले यांनी १९४८ साली पुण्यातील भिडे वाड्यात मुलींची पहिली शाळा काढून तेथील शिक्षिकेची जबाबदारी सावित्रीबाईंवर सोपवली. पुढे सावित्रीबाई या शाळेच्या मुख्याध्यापिकापदी आरूढ झाल्या.शाळेच्या मुख्याध्यापकपदी आरूढ झालेली भारतातील पहिली महिला म्हणजे सावित्रीबाई फुले त्याचप्रमाणे मुलींसाठी पहिली शाळा काढणारे पहिले भारतीय म्हणजे महात्मा जोतीराव फुले. महात्मा जोतीराव फुलेंनी देशात मुलींच्या शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. आज सर्वच क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत असे कोणतेच क्षेत्र नाही की ज्यात महिलांनी आपला झेंडा रोवला नाही. कला, क्रीडा, साहित्य, विज्ञान, तंत्रदान, शिक्षण, समाजकारण, राजकारण, अर्थकारण अशा सर्वच क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत त्या केवळ आणि केवळ फुले दाम्पत्यांमुळे. महिलांसाठी फुले दाम्पत्यांनी जे कार्य केले ते ३३ कोटी देवांनीही केले नाही. महात्मा फुले यांनी पुण्यातील वेताळ पेठेत १८५२ साली अस्पृश्यांसाठी शाळा स्थापन केली. त्यांच्या या शैक्षणिक कार्याला सनातन्यांनी खूप वविरोध केला. मुलींनी शिक्षणासाठी घराबाहेर पडणे म्हणजे धर्म बुडणे अशी आरोळी ठोकत सनातनी लोकांनी महात्मा फुले यांच्या या महान कार्यास विरोध केला. त्यांना मारण्यासाठी मारेकरी पाठवले पण महात्मा फुले डगमगले नाहीत. ते आपल्या भूमिकेवर ठाम राहिले. महात्मा जोतीराव फुले यांना वाचनाची खूप आवड होती. विवीध महापुरुषांचे जीवनचरित्र वाचणे व त्यातून प्रेरणा घेणे हा त्यांचा आवडीचा छंद. छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र व थॉमस पेन या विचारवंतांच्या राईट ऑफ थॉट्स या ग्रंथाचा त्यांच्यावर खूप प्रभाव पडला. बहुजन समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा आणि दारिद्य पाहून ते खूप अस्वस्थ होत. जातपात, अस्पृश्य- स्पृश्य भेदभाव पाहून त्यांना खूप राग येत. समाजातील अज्ञान अंधश्रद्धा दूर करून समाजातील जातीभेद नष्ट करण्याचा त्यांनी निश्चय केला. कोणताही धर्म ईश्वराने निर्माण केलेला नाही आणि चातुर्वर्ण्य व जातीभेद ही निर्मिती मानवाचीच आहे असे त्यांचे रोखठोक मत होते. सर्व मानव एकच आहेत म्हणून सर्वांनी गुण्यागोविंदाने राहावे असे त्यांचे मत होते. त्यांनी लिहिलेल्या शेतकऱ्यांचा आसूड या पुस्तकातून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची विदारक दुर्दशा आणि दारिद्र्याची वास्तवता विशद केली आहे. या पुस्तकाद्वारे विशाल दृष्टिकोनाचे क्रांतिकारक म्हणून महात्मा फुलेंचे दर्शन होते. महात्मा फुले यांनी सार्वजनिक सत्यधर्म हा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ सत्यशोधक समाजाचा प्रमाण ग्रंथ मानला जातो. तुकारामांच्या अभांगाचा त्यांना गाढा अभ्यास होता. अभंगाच्या धर्तीवर त्यांनी अनेक अखंड रचले. त्यांना सामाजिक विषमतेचे जागतिक भान होते म्हणूनच आपला गुलामगिरी हा ग्रंथ त्यांनी अमेरिकेतील कृष्णवर्णीयांना समर्पित केला. अस्पृश्यांची कैफियत हा त्यांचा अप्रकाशित ग्रंथ आहे. २८ नोव्हेंबर १८९० रोजी महात्मा फुले यांचे निधन झाले. आज त्यांच्या स्मृतिदिनी त्यांचे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे. महात्मा फुलेंना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!



**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

### आळंदी येथील अधिवेशनात वारकर्यांचा 'धर्मजागर' करण्याचा एकमुखी निर्धार !

# हिंदूंनी जात-पात, संप्रदायाच्यावर येऊन राष्ट्र आणि धर्मकार्यासाठी हिंदुत्वाची वज्रमूठ सिद्ध करावी - प.पू. गोविंददेव गिरी




**पुणे । प्रतिनिधी -** महाराष्ट्राच्या विधानसभेच्या झालेल्या निवडणुकीत प्रथमच हिंदूंनी जात-पात, संप्रदाय यांसह कशातच न अडकता हिंदु धमीय म्हणून हिंदुत्वाच्या सूत्रावर मतदान केले. जे हिंदु धर्माचे रक्षणकर्ते आहेत अशांना सत्तेपर्यंत पोचवणे यालाच आजच्या काळातील धर्मसंस्थापना म्हणता येईल. सद्यस्थितीत बांगलादेशात हिंदूंवर अत्याचार होत आहे, हे त्यामुळे संकट आता आपल्या उंबरठ्यापर्यंत आले आहे. तरी यापुढील काळात हिंदूंनी सजग राहून जात-पात, संप्रदाय यांच्यावर येऊन राष्ट्र आणि धर्मकार्यासाठी हिंदुत्वाची वज्रमूठ सिद्ध करावी, असे आवाहन अयोध्या येथील श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासाचे कोषाध्यक्ष प.पू. गोविंददेव गिरी यांनी केले. २६ नोव्हेंबरला श्री देविदास धर्मशाळा तथा वै. मामासाहेब दांडेकर स्मृती मंदिर, गोपाळपुरा, आळंदी येथे १८ वे वारकरी महाअधिवेशन आणि धर्मसभा पार पडली. त्या प्रसंगी त्यांनी हे आवाहन केले. हिंदु जनजागृती समिती, राष्ट्रीय वारकरी परिषद आणि वारकरी संप्रदाय यांच्या संयुक्त विद्यमाने पू. अमृताश्रम स्वामी महाराज (दंडी स्वामी) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या अधिवेशनात वारकर्यांनी 'धर्मजागर' करण्याचा एकमुखी निर्धार व्यक्त केला. अधिवेशनाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय वारकरी परिषदेचे प्रवक्ता ह.भ.प. निवृत्ती महाराज हल्लाळीकर यांनी रसाळ वाणीत केले.

प.पू. गोविंददेव गिरी पुढे म्हणाले, ''समाजाला, देशाला तारुन जाण्यासाठी, लोकांना जागवण्यासाठी 'छत्रपती शिवाजी महाराज' हा एकच शब्द पुरे आहे. त्यामुळे मी 'शिवचैतन्य जागरण यात्रा' चालू केली आहे. महाराष्ट्रात गेल्या ७०० वर्षांपेक्षा अधिक काळ वारकरी संप्रदाय-संत परंपरा यांनी लोकांना जागृत करण्याचे मोठे कार्य केले आहे. पंतप्रधानांनी 'वक्फ बोर्ड' रहित करण्याची घोषणा दिल्यावर काही लोकांनी या विरोधात आता रस्त्यावर उतरून विरोध करण्याची सिद्धता केली. त्यामुळे हिंदूंनीही यापुढील काळात त्याला त्याच भाषेत प्रत्युत्तर देण्याची सिद्धता ठेवली पाहिजे, तसेच यापुढील काळात 'हिंदू-हिंदू, भाई-भाई' हीच घोषणा आपण दिली पाहिजे.''

**मान्यवरांनी व्यक्त केलेली विविध मनोगते**

पू. अमृताश्रम स्वामी महाराज (दंडी स्वामी) म्हणाले, ''स्वामी विवेकानंद यांनी ज्याप्रमाणे धर्मयोद्धाचे कार्य केले त्याप्रमाणेच आज प.पू. गोविंद देवगिरी महाराज कार्य करत आहेत. प.पू. वक्ते बाबा यांनी हिंदुत्वासाठी फार मोठे कार्य केले. या अधिवेशनातून प्रेरणा घेऊन आपण सर्वांनी धमचे कार्य करावे !'' पालघर हिंदू शक्तीपीठाचे हिंदूभूषण श्री. भारतानंद सरस्वती महाराज म्हणाले, ''गेली अनेक वर्षे आम्ही पालघरसारख्या भागातही हिंदुत्वाचे कार्य चालू ठेवलेले आहे. या अधिवेशाच्या माध्यमातून सातत्यने धर्मजागृती करण्याचा प्रयत्न चालू आहेत. तरी आपण सर्वांनी यापुढील काळात संघटितपणे कृती करण्याचा निर्धार केला पाहिजे.'' ह.भ.प. जर्नादन महाराज मेटे म्हणाले, ''गेल्या पाच वर्षांपासून आम्ही गाव तिथे हनुमानचालिसा हा उपक्रम चालू केला असून देवगिरी प्रांतात ७०० हून अधिक गावात हा उपक्रम चालतो. लहान पिढी हीच पुढे जाऊन राष्ट्रासाठी कार्य करणारे असणारे त्यांच्यावर संस्कार होण्यासाठी गावागावात बालसंस्कार वर्ग चालू करणे आवश्यक आहे.'' लातूर येथील शिवयोग भवन मठाधिपती श्री श्री आदिनाथ स्वामीजी म्हणाले, ''तरुणांच्या हातात धर्माची धुरा देण्याची आवश्यकता असून देव, देश, धर्म यांसाठी युवकांनी सतत कृतीशील रहाण्याचा संकल्प केला पाहिजे.'' स्वराज्य संघाचे अध्यक्ष प्रबोधनकार, कथाकार बाजीराव महाराज बांगर म्हणाले, ''या निवडणुकीत वक्फ बोर्डाला कोट्यवधी रुपये देण्याची मागणी करण्यात आली होती. मुल्ला-मौलवी यांना १५ सहस्र रुपये वेतन देण्याची मागणी करण्यात आली होती. हे सर्व 'फतवे' हिंदूंनी मोडून काढले.'' वीर देवस्थान येथील गुरव प्रसाद दळवीगुरुजी म्हणाले, ''सद्यस्थितीत तरुण जागृत होत असतांना दिसतोय; मात्र तो अजून जागृत झाला पाहिजे. येणारी पिढी धर्मकार्यात सहभागी होण्यासाठी तिला धर्माचे आरचण शिकवावे लागेल !''

१० वर्षांच्या कु. ईश्वरी गजानन पाटील हिने सनातन संस्था, हिंदु जनजागृती समिती आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांच्या माध्यमातून धर्मशिक्षण घेण्याचे आवाहन केले. या अधिवेशनात मुंबई येथील ह.भ.प. विश्वनाथ महाराज वारींगे, ह.भ.प. रामकृष्ण महाराज लवीतकर, ह.भ.प. कारभारी अंभोरे महाराज यांसह अन्य मान्यवरांनी त्यांचे मनोगत व्यक्त केले. या प्रसंगी हिंदु जनजागृती समितीप्रणीत रणरागिणी शाखेच्या कु. क्रांती पेटकर यांनी 'लव्ह जिहाद'ची भयावहता सर्वांसमोर मांडली. विविध ठरावांचे वाचन करून पसायदानाने अधिवेशनाची सांगता झाली.

**विशेष -** हिंदूभूषण श्री. भारतानंद सरस्वती महाराज यांनी अधिवेशनात कालावधीत दिलेल्या घोषणांनी अधिवेशनात वारकर्यांमध्ये नवचैतन्य पसरले, तसेच श्री. विवेक सिन्नरकर यांनी 'भारत हिंदुस्थान है-हिंदूओ की शान है', हे गीत सर्वांकडून गावून घेतले. यामुळे हिंदुत्वाचा जागर जागवला गेला.

**या प्रसंगी करण्यात आलेले विविध ठराव -** 'हरिद्वार' आणि 'ऋषिकेश' या तीर्थक्षेत्रांच्या धर्तीवर श्रीक्षेत्र पंढरपूर, देहू, आळंदी, पैठण आदी तीर्थक्षेत्रे यांसह राज्यातील सर्व मंदिरे, तीर्थक्षेत्रे यांचा परिसर १०० टक्के 'मद्य-मांस मुक्त' करण्यात यावीत, पंढरपूर येथील चंद्रभागा अन् आळंदी येथील इंद्रायणी नदीत सांडपाणी सोडण्यास बंदी घालावी, हिंदूंची भूमी-मंदिरे बळकावणारा 'वक्फ' कायदा रहित करावा, जादूटोणाविरोधी कायदां जनजागृती प्रचार आणि प्रसार कायक्रम अंमलबजावणी समितीच्या सहअध्यक्ष पदावरून शाम मानव यांची तात्काळ हकालपट्टी करावी, देशात समान नागरी कायदा आणि लोकसंख्या नियंत्रण कायदा करावा यांसह विविध ठराव या अधिवेशनात करण्यात आले.

**निरंजन शास्त्री कोठेकर महाराज आणि दैनिक 'सनातन प्रभात'चे प्रतिनिधी यांचे सत्कार !**

या प्रसंगी वारकरी शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष भागवताचार्य ह.भ.प. केशव महाराज उखळीकर, तसेच हिंदु जनजागृती समितीचे श्री. पराग गोखले यांनी प.पू. गोविंददेव गिरी यांचा शाल आणि श्रीफळ देऊन सत्कार केला. सातत्याने धर्मकार्यासाठी देवीदास धर्मशाळा उपलब्ध करून देणारे आणि धर्मकार्यात अग्रेसर असणारे देवीदास धर्मशाळेचे अध्यक्ष ह.भ.प. निरंजन शास्त्री कोठेकर महाराज यांचा, तसेच वारकर्यांच्या विविध प्रश्नांचा दैनिक 'सनातन प्रभात'च्या माध्यातून वृत्त, लेख या माध्यमातून सातत्याने वाचा फोडणारे, इंद्रायणी-चंद्रभागेच्या प्रदूषणासाठी सातत्याने आवाज उठवणारे दैनिक 'सनातन प्रभात'चे प्रतिनिधी श्री. अजय केळकर यांचा प.पू. गोविंददेव गिरी महाराज यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी ह.भ.प. रामचंद्र महाराज पेनोरे, सांस्कृतिक वार्तापत्राचे विश्वस्त आणि कीर्तनकार श्री. विवेक सिन्नरकर, कोल्हापूर येथील ह.भ.प. मधुसूदन महाराज पाटील, ह.भ.प.जगन्नाथ महाराज मस्के, अच्युत महाराज दस्तापूरकर, ह.भ.प. तुणतुणे महाराज, प्रज्ञापुरी ज्ञानपीठ अक्कलकोटचे पीठासन धर्माधिकारी श्री. प्रसाद पंडित, पंढरपूर येथील विठ्ठल-रुक्मिणी संस्थानचे विश्वस्त ह.भ.प. प्रकाश महाराज जवंजाळ, पालघर हिंदू शक्तीपीठाचे हिंदूभूषण श्री. भारतानंद सरस्वती महाराज, हिंदु जनजागृती समितीचे प्रवक्ते डॉ. उदय धुरी, राष्ट्रीय वारकरी परिषदेचे कार्याध्यक्ष ह.भ.प. बापू महाराज रावकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

# अभिजात भाषेच्या दर्जामुळे मराठीचे सबळीकरण होईल - परशुराम पाटील



**मुंबई -** मराठीला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाल्याप्रकरणी 'अभिजात मराठी भाषा समिती'चे सदस्य आणि मराठी भाषा संचालनालयाचे माजी संचालक श्री. परशुराम पाटील यांचा विशेष सत्कार मुंबई येथील नरेवाडी विकास मंडळ आणि धनलक्ष्मी पतसंस्था यांच्या वतीने लोअर परेल मुंबई येथील बीडीडी चाळ मधील बुद्ध विहार हॉलमध्ये करण्यात आला.

यावेळी बार कौन्सिलचे सदस्य सुभाष घाडगे, धनलक्ष्मी पतसंस्थेचे अध्यक्ष हरिश्चंद्र गोविळकर, उपाध्यक्ष लक्ष्मण पाटील यांसह शंकर पवार, बाळकृष्ण कदम, अधिवक्ता दीपक निलवे, संजय रणदिवे, विक्रम कोकितकर इत्यादी पदाधिकारी आणि कोल्हापूर जिल्ह्यातील मुंबई निवासी मराठी भाषाप्रेमी मोठया संख्येने उपस्थित होते. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण असतांना मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त होण्याविषयीचा प्रस्ताव केंद्रशासनाकडे पाठवण्यासाठी मराठी भाषातज्ञांची एक समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीच्या काही बैठकींना उपस्थित राहून श्री. परशुराम पाटील यांनी मार्गदर्शन केले होते. सत्काराला उत्तर देताना

परशुराम पाटील, माजी संचालक, मराठी भाषा संचालनालय यांनी आपले मनोगत व्यक्त केले की, अभिजात भाषेच्या दर्जामुळे मराठीचे सबळीकरण होईल. मराठीतील प्राचीन वाङ्मयाचा अन्य भाषेत अनुवाद होईल. मराठी भाषेत संशोधन करणाऱ्यांना 'स्कॉलरशिप' दिली जाईल. महाराष्ट्रातील विविध बोलीभाषांचा अभ्यास आणि संशोधन होईल. महाराष्ट्रातील १२ सहस्र ग्रंथालयांचे सशक्तीकरण करण्यासाठी अनुदान दिले जाईल. भारतातील ४५० विद्यापिठांमध्ये मराठी भाषेचे अध्ययन केले जाईल. व्यवसाय मिळवून देणारी 'अर्थार्जनाची भाषा' आणि उच्च शिक्षण देणारी 'ज्ञानभाषा' असा मराठीचा विकास होऊ शकेल.

पान १ वरुन

## जालना कबड्डी ...

बाबासाहेब मंडाळे ९८२३६ ६१८६१ आणि रविंद्र ढगे ९३२५२ ३९९९९ असे आव्हाण जालना कबड्डी असोसिएशन केले आहे. स्पर्धेचे ठिकाण जिल्हा परिषद शाळा, पिरपिंपळगाव राजूर रोड, तालुका जालना. स्पर्धा शुक्रवार २९ नोव्हेंबर २४ सकाळी ९ वाजता स्पर्धेला सुरुवात होणार आपले संघ त्वरित वरील सयोजकांडे नोंदणी करावे. उशीरा आलेल्या संघाचा विचार केला जाणार नाही. याची नोंद संघ व्यवस्थापकांनी घेऊन वेळेवर नोंद करून सहकार्य करावे. स्पर्धे साठी मुला मुलींच्या संघासाठी २०० रुपये नोंदणी फी आकारण्यात येईल याची नोंद घ्यावी. असे आव्हान कबड्डी असोसिएशनचे डॉ. अशोक हजारे, नंदकिशोर खर्डेकर, डॉ देवेश पाथ्रीकर, माधवी काळे, राहुल वाहुळे, बाबासाहेब मंडाळे, रामदास निहाळ यांनी केले आहे.

## पक्षविरोधी काम...

निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली आहे. दिलेल्या निवेदनावर प्रदेश सचिव महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी किशन-जेठे, जिल्हा काँग्रेस कमिटीचे असंघटित कामगार जिल्हाध्यक्ष शेख शमशोद्दिन, अल्पसंख्यांक विभागाचे काँग्रेस जिल्हाध्यक्ष अब्दुल रफिक, किसान विभाग काँग्रेस कमिटीचे जिल्हा उपाध्यक्ष सय्यद मुन्शी, काँग्रेस कमिटीचे जिल्हा उपाध्यक्ष चंद्रकांत रत्नपारखे इत्यादींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## जालना जिल्ह्याच्या ...

घरकुल योजना, शबरी आवास योजनेच्या माध्यमातून आमदार बबनराव लोणीकर यांच्या विशेष पर्यत्नातून सुमारे २५ हजार घरकुल मंजूर झाली आहेत. याबरोबरच मागील त्या शेतकऱ्याला सिंचन विहीर उपलब्ध करून देत असताना आमदार लोणीकर यांच्या माध्यमातून मतदारसंघात सुमारे ५००० सिंचन विहिरी शेतकरी बांधवांना उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. याबरोबरच दिव्यांग बांधवांनी निराधारांची काळजी कुटुंबातल्या व्यक्तीप्रमाणे आमदार लोणीकर यांनी घेतली असून परतुर तालुक्यातील दिव्यांग बांधवांना १५ लाख रुपये किमतीचे साहित्य आमदार लोणीकर यांनी गेल्या महिन्यात वाटले असून याबरोबरच मंठा तालुक्यातील दिव्यांग बांधवांना पंधरा लाख रुपये किमतीचे सह उपकरण साहित्य आमदार लोणीकर यांनी स्वतःच्या हस्ते वाटप केले आहे. याबरोबरच परतूर विधानसभा मतदारसंघातील निराधार वृद्ध यांना शासनाच्या वतीने आधार मिळावा म्हणून मंठा परतूर शहरात वेळोवेळी कॅम्प आयोजित करून मतदार संघातील सुमारे २७ हजार वृद्ध व निराधारांना मासिक मानधन मिळावी म्हणून त्यांनी सतत तहसील कार्यालय मंठा परतूर व जालना येथे दरमहा आढावा बैठकी घेऊन सतत जिल्हाधिकाऱ्यांच्या दालनात बैठकी घेऊन निधी उपलब्ध करून दिला दिला असल्याने ते कष्टकरी शेतकरी शेतमजुरा बरोबर वृद्ध व दिव्यांगाचे ही आधारस्तंभ बनले आहेत.

गेली ४० वर्ष ते भारतीय जनता पक्षात अशी अत्यंत निष्ठेने काम करत असून. जालना जिल्ह्यातील शेतकरी कष्टकरी कामगार गोरगरीब पीडित वंचित विस्थापित याबरोबरच विद्यार्थ्यांच्याही न्याय हक्का करिता ती गेली ४० वर्ष अविरत संघर्ष करत आलेलं एक अनुभवी नेतृत्व जालना जिल्ह्याला लाभलं आहे. २०२४ च्या या सार्वत्रिक विधानसभा निवडणुकीत जालना जिल्ह्यातील पाचही विधानसभेच्या जागेवर महायुतीचे पाचही उमेदवार विजयी झाल्याने पुन्हा जालना जिल्ह्यावर बाहेरचा पालकमंत्री लादण्याचा गंभीर प्रसंग जिल्ह्यावर येऊ नये. जालना जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाकरिता अनुभवी कुशल अभ्यासू नेतृत्व असलेले परतूर विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार बबनराव लोणीकर यांना राज्याच्या मंत्रिमंडळात संधी द्यावी अशी अपेक्षा. परतुर विधानसभा मतदारसंघातील भारतीय जनता पक्षाचा कार्यकर्त्यांसह सर्वसामान्य नागरिकांची असल्याची बोलले जात आहे. आमदार बबनराव लोणीकर यांना मंत्रिमंडळातून डावलन म्हणजे जालना जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाला डावलन हे असंच होईल अशी भीती जिल्हाभरातल्या सर्वसामान्य नागरिकांमध्ये आहे.

# मत्स्योदरी अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची पाथ्रीकर कॅम्पसला भेट



**बदनापूर । प्रतिनिधी -** मत्स्योदरी आभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी बदनापूर येथील पाथ्रीकर कॅम्पस येथे सुरू असलेल्या बांधकामाला भेट देऊन बांधकामाचे बारकावे प्रत्यक्ष बघितले. महाविद्यालयाने आयोजित केलेल्या या अभ्यासदौर्यात स्थापत्य विभागाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. मत्स्योदरी आभियांत्रिकी महाविद्यालयातील स्थापत्य विभागातर्फे विद्यार्थ्यांसाठी अभ्यास दौर्याचे आयोजन केले होते. बदनापूर येथील निर्मल क्रीडा व समाज प्रबोधन ट्रस्टच्या पाथ्रीकर कॅम्पस येथे सुरू असलेल्या इमारत बांधकामाला या विद्यार्थ्यांनी भेट देऊन पाहणी केली. या ठिकाणी सुरू असलेल्या विविध बांधकामाचा अभ्यास पाहणी या विद्यार्थ्यांनी केली. या प्रसंगी मोरया कंन्स्ट्रक्शनचे अभियंता मुकेश सोनवणे यांनी इमारतीचा स्लॅबपासून ते बेसमिंटपर्यंत होणार्या कामाची माहिती दिली. पुस्तकी ज्ञानापेक्षा प्रत्यक्ष काम करताना येणार्या अडचणी यावेळी त्यांनी प्रात्यक्षिक स्वरूपात दाखवल्या. प्रत्यक्ष बांधकाम करत असताना अभियंत्याने काय काळजी घ्यावी. बांधकाम मजबूत होण्याबरोबरच आर्थिक नियोजन कसे करावे या बाबत ही मुकेश सोनवणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. पाथ्रीकर कॅम्पसचे अध्यक्ष डॉ. देवेश पाथ्रीकर यांच्या वतीने संस्थेचे प्रतिनिधी नंदकिशोर नाईकवाडे यांनी विद्यार्थ्यांशी चर्चा केली. या वेळी मत्स्योदरी आभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्रा. प्रवीण आव्हाड, प्रा. निता वायाळा, प्रा. जयेश त्रिवेदी, प्रा. नंदकिशोर वाघ, प्रा. प्रसाद देशमुख यांनी विद्यार्थ्यांना तांत्रिक बाबींबाबत मार्गदर्शन केले. सदरील अभ्यासदौरा प्राचार्य डॉ. एस. के. बिरादार, उपप्राचार्य प्रा.आर. एल. करवंदे, प्रा. के.टी. खर्जुले यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी झाला. या अभ्यासदौर्यामध्ये स्थापत्य विभागाच्या विद्यार्थी - विद्यार्थीनींनी थेट सहभाग नोंदवला होता.

## २६/११ हल्ल्यातील शहीदांना श्रध्दांजली

# सदर बाजार पोलीस ठाण्यात रक्तदान शिबिराचे आयोजन




कर्मचाऱ्यांसह DYSP अनंत कुलकर्णी यांनी ही केले रक्तदान

**जालना । प्रतिनिधी -** मुंबई येथे २६/११ रोजी झालेल्या हल्ल्यातील शूर शहिदांना श्रद्धांजली अर्पण करून त्यांच्या बलिदानाला उजाळा देण्यासाठी मागील पाच वर्षा पासून जालन्यातील सदर बाजार पोलीस ठाण्यात २६/११ या दिवशी पोलीस प्रशासनाच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने आज दि. २७ बुधवार रोजी सकाळी ०९ वा. पासून सदर बाजार पोलीस ठाण्यात इंडियन मेडिकल असोशियसन आणि कऊरुउ बँक यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

जालना पोलीस प्रशासनाने आपली जबाबदारी म्हणून रक्त संकलन करण्याचे ठरवले असून उपविभागिय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्यासह पोलीस दलातील कर्मचाऱ्यांनी या शिबिरात मोठ्या प्रमाणात रक्तदान केले.

शहिदांच्या स्मृतीस ऊजाळा मिळण्यासाठी सदर बाजार पोलीस ठाण्यात दरवर्षी २६/११ रोजी रक्तदान शिबिर घेण्यात येते. सदर बाजार पोलीस ठाण्यामध्ये आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरात पोलीस कर्मचाऱ्यांसोबत नागरिकांनी सुध्दा मोठ्या प्रमाणात रक्तदान करून शहिदांच्या स्मृतीला उजाळा द्यावा,दिवसेंदिवस रक्तपेढ्यांमध्ये रक्ताचा तुटवडा जाणवत असून गरजूंना वेळेवर रक्त मिळण्यासाठी अशा प्रकारचे रक्तदान शिबिराची नितांत गरज असून आज च्या शिबिरामध्ये शंभर पेक्षा जास्त रक्तदाते रक्तदान करतील असा विश्वास जिल्हा पोलीस आधीक्षक अजय कुमार बंसल यांनी व्यक्त केला आहे.

यावेळी रक्तदात्यांना पोलीस अधीक्षक यांच्या हस्ते प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले.

यावेळी जिल्हा पोलीस आधीक्षक अजय कुमार बंसल,उपविभागिय पोलीस आधिकारी अनंत कुलकर्णी, पो.निरि.संदिप भारती,पो. निरि. सम्राटसिंग राजपूत,पो. निरि.सुरेश ऊनवणे,पो. निरि.सिध्दार्थ माने यांच्या सह आयएमए चे तसेच एचडीएफसी बँकेचे पदाधिकारी व कर्मचारी ई. ची उपस्थिती होती.

# सिद्धार्थ महाविद्यालयात संविधान दिन साजरा




**जाफराबाद । प्रतिनिधी -** येथील सिद्धार्थ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात संविधान दिन साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रमेश देशमुख हे होते तर प्रमुख वक्ते म्हणून प्रा. बी. बी. चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले. व्यासपीठावर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ .एस. के. सर्जे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच प्रा. अनिल वैद्य यांनी भारतीय संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन केले. त्यानंतर प्रमुख वक्ते प्रा.बी.बी चव्हाण यांनी आपल्या मनोगतामध्ये भारतामध्ये पूर्वीपार म्हणजे अगदी बुद्धकाळातही समता, स्वातंत्र्य, बंधुता,या नैतिक मूल्ये,अधिकार आणि कर्तव्येयांची जोपासना केली जात असे,भारत स्वातंत्र्यानंतर भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून कायदा, सुव्यवस्था, अधिकार,कर्तव्ये,श्रद्धा,उपासना, यांची अंमलबजावणी सुरू झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी२ वर्षे ११ महिने१८ दिवस सतत लिखाण करून भारतीय राज्यघटनेची निर्मिती केली व त्यामध्ये न्याय, श्रद्धा, स्वातंत्र्य, समानता, बंधुता यावर आधारित भारतीय संविधान निर्माण केले म्हणून आज खंडप्राय अशा देशात आदर्श लोकशाही यशस्वीपणे वाटचाल करीत आहे असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. देशमुख यांनी भारतीय संविधान व विद्यार्थ्यांचे कर्तव्य यावर सखोल असे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.एम.जी मोरे यांनी केले तर आभार प्रा.एस. टी. साळवे यांनी मानले.या कार्यक्रमाचे औचित्य साधून सिल्लोड शिक्षण संस्थेचे सन्माननीय सचिव प्रा. डॉ.राहुलभाऊ म्हस्के यांच्या सौजन्याने संविधान उद्देशिकेच्या १००० प्रती प्रा.अनिल वैद्य यांनी सिद्धार्थ महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांना तसेच न्यू हायस्कूल जाफराबाद व जाफराबाद पंचकृषीतील समस्त बौद्ध बांधवांनी आयोजित केलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकातील कार्यक्रमात वाटप केल्या. तसेच एन.एस. एस.विभागाच्या वतीने संविधान रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे आयोजन

जालना । प्रतिनिधी - जालना जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा क्रीडा संकुल, जालना येथे जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

जालना जिल्ह्यातील १५ ते २९ वर्षे वयोगटातील जास्तीत जास्त युवक-युवतींनी सहभागासाठी विहीत नमुन्यातील प्रवेश अर्ज दि. २९ नोव्हेंबर २०२४ पर्यंत जालना येथील जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयात सादर करून महोत्सवात सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी, जालना यांनी केले आहे. जिल्हास्तरीय युवा महोत्सवातील स्पर्धेबाबत सुचना, नियम व अटी तसेच अधिक माहितीसाठी कार्यालयीन वेळेत क्रीडा अधिकारी आरती चिल्लारे (७७५८८६३९९१) यांच्याशी संपर्क साधावा.

# बौद्धांचे आद्यकर्तव्य आहे की, त्यांनी रविवारी बुद्ध विहारात जावे

## ७५ वी हिरक महोत्सवी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी -** फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल, दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर घम्म सेवा संघ बौद्ध विहार, जय भवानी नगर, सिडको यांच्या संयुक्त विद्यमाने २४ नोव्हेंबर २०२४ ला जय भवानी नगर येथील धम्म सेवा संघ बौद्ध विहारात ७५ व्या हिरक महोत्सवी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेचे उद्घाटन करताना माजी शिक्षणाधिकारी डॉ. रमेशचंद्र धनेगांवकर म्हणाले की, सदाचरणाने वागणा-यांचा समाजात लोक सन्मान करतात. म्हणून सदाचरण समजून घेण्यासाठी दर रविवारी बौद्धांनी बुद्ध विहारात गेले पाहिजे. ज्यामुळे प्रेरणा मिळते. तथागत अमर्याद ज्ञानाचे धनी होते.

याप्रसंगी किशोर हिरामण पाटील म्हणाले की, मला बाबासाहेब आंबेडकरांचे वैचारिक साहित्य माहीत पडल्याने फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या समन्वयातून मी बुद्ध विहारात पहिल्यांदा आलो, ज्यामुळे पुनर्जन्म झाल्यासारखे वाटत आहे. रामदास वाघमारे म्हणाले की, विहार व्यवस्थापनाने वर्तनातून सिद्ध करावे की, इतरांनी विहारात का आले पाहिजे? जगात २७ बौद्ध राष्ट्रे आहेत. ताराचंद गायकवाड म्हणाले की, बुद्ध विहार हे धम्म चळवळीचे केंद्र आहे. येथे बालपणापासून मुलांवर संस्कार केले पाहिजेत. अर्जुन चव्हाण म्हणाले की, भूतान सारख्या देशात चौकाचौकात पोलीस पहायला मिळत नाही कारण त्या बौद्ध राष्ट्रात धम्माचे पालन होत असल्याने गुन्हेगारी नगण्य प्रमाणात आहे.

प्रमुख वक्ते श्रावण गायकवाड म्हणाले की, बौद्धांनी २२ प्रतिज्ञांचे पालन केले पाहिजे. पंचशील त्रिशरणानंतर प्रत्येक रविवारी चर्चा सत्राचे आयोजन केले पाहिजे. जगात एकच बुद्ध आहे, ते म्हणजे तथागत बुद्ध होय. तर एकच बोधिसत्व आहे, ते म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होय. आपण मूळ नागवंशीय लोक आहोत.

कार्यशाळेचा अध्यक्षीय समारोप करताना फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, दक्षिण भारतातील द्रविड व उत्तर भारतातील नाग लोक हे नागवंशीय लोक आहेत. म्हणून त्यांना संघटीत करण्यासाठी आम्ही दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) हे राष्ट्रीय संघटन चालवीत आहोत. विहारात वक्ते, स्पर्धक, वादविवादपटू निर्माण करण्यासाठी सातत्याने कार्यशाळेचे आयोजन केले पाहिजे, ज्यातून नवीन पिढी घडेल. बालसंस्कार केंद्रे चालवून बालमनावर संस्कार केले पाहिजेत. यासाठी सत्येंद्र तेलतुंबडे यांनी लाफिंग बुद्धा अंतर्गत प्ले ग्रुप व नर्सरी सुरू करायचे आव्हान केले आहे. ज्यात आपण सहभाग घ्यावा. २४ नोव्हेंबर १९५६ ला काशी विद्यापीठात मार्गदर्शन करताना 'ब्रह्मं सत्यं जगन्मिथ्या' या शंकराचार्याच्या विधानाचा समाचार घेताना ब्रह्म सत्य आहे तर मग पंचज्ञानेंदियाद्वारे मिळालेले व विज्ञानाने शोधलेल्या सत्याचे काय? असा प्रश्न विचारून वैज्ञानिक दृष्टिकोन अंगीकारून सत्याकडे वळण्याचा प्रयत्न केला पाहिजे असा संदेश डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आज रोजी दिवसभर सभा, संमेलन, बैठकीत मार्गदर्शन केले होते. त्यात २४ नोव्हेंबर १९५६ ला सारनाथ येथे मार्गदर्शन करताना बौद्धांचे आद्यकर्तव्य आहे की, त्यांनी दर रविवारी बुद्ध विहारात जावे असा आदेशयुक्त संदेश दिला होता. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पावलावर पाऊल ठेवून फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलने आज रोजी सकाळ, दुपार व संध्याकाळी अशा तीन सत्रात शहराच्या सिडको, हडको व साकेत नगरात वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळांचे आयोजन केले आहे. २५ नोव्हेंबर १९५६ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, माणसा माणसातील संबंध प्रेम, करुणा या तत्त्वानुसार जोडणा-या बौद्ध धर्माचा मध्यवर्ती सिद्धांत समता आहे. म्हणून समाजात समता स्थापित करण्यासाठी अंमलबजावणी व्हावी म्हणून उपाय योजना क्रियान्वित करणे आवश्यक आहे. करिता प्रत्येक बौद्धांचे आद्यकर्तव्य आहे की त्यांनी केवळ दर रविवारीच नव्हे! तर दररोज बुद्ध विहारात जाऊन चर्चेत सहभागी होण्याची नितांत आवश्यकता आहे.



या कार्यशाळेचे प्रास्ताविक एड. विलास रामटेके, सूत्रसंचालन गौतम पारखे यांनी केले. यावेळी श्रावण गायकवाड यांनी बुद्ध आणि त्यांचा धम्म या ग्रंथाचे उपस्थितांना वाटप केले. या कार्यशाळेला बी. बी. मेश्राम, एड. विलास रामटेके, रावसाहेब सोनकांबळे, रमेश जोगदंडे, रजनीकांत दिवेकर, अर्जुन चव्हाण, व्ही. बी. गायकवाड, टी. एन. सोनवणे, निर्मला सोनवणे, मधुकर लांडगे, रामदास वाघमारे, मनोज घोडेराव, सिद्धार्थ बनकर, गोविंद वाहूळ, ए. एस. जवंजाळ, इंजिनिअर किशोर पाटील, श्रावण गायकवाड, सुनिता बनकर, मंगला साळवे, कविता डोंगरे, सीमा साळवे, लक्ष्मी गायकवाड, विमल भुजंग, कमल पारखे, अशोक सुरडकर, दत्तू सोनवणे, नेहा आठवले, नामदेव वाकडे, संविधान वाकळे, पुरभाजी पंडित इत्यादी शेकडो उपासक उपस्थित होते. अशाप्रकारे संजय जी केदार यांच्या आभार प्रदर्शनाने हर्षोल्हासात कार्यशाळेची सांगता झाली.



**महाराष्ट्रात झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीत उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली महायुतीने घवघवीत यश प्राप्त केले आहे.राष्ट्रवादी काँग्रेसच्या या घवघवीत विजयाचे शिल्पकार असलेले अजित पवार यांचे पुष्पगुच्छ देऊन सत्कार करतांना राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्याक विभागाचे राष्ट्रीय सं. सचिव अर्शद बागवान दिसत आहेत.**

# संविधान आत्मसात केले तर जातीभेद नष्ट होईल - अनंत कुलकर्णी

**जालना । प्रतिनिधी -** संविधान गौरव रॅली व महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने संविधान स्तंभ येथे संविधान दिन आज दि.२६ मंगळवार रोजी दुपारी बारा वा. च्या सुमारास उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुळकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला त्यावेळी अनंत कुळकर्णी बोलत होते.

पुढे बोलताना म्हणाले की आज आपला देश संविधनाप्रमाने चालत आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला संविधानाच्या माध्यमातून जगातील उत्कृष्ट घटना दिली आहे. त्याचा आपण आदर करून उपयोग नाही तर ती प्रत्यक्ष नागरिकाने संविधान अंमलात आणले पाहिजे. यामुळे सर्वांना समान न्याय मिळेल. सर्व जाती धर्मांना त्यांच्या धर्माप्रमाणे वागण्याचा अधिकार दिला आहे, त्याचा व्यवस्थित वापर झाला पाहिजे. या कार्यक्रमांत उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले, सर्वप्रथम महानगर पालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर यांनी संविधान स्तंभास पुष्पहार अर्पण केला. संविधान गौरव समितीचे अध्यक्ष दिनकर घेवंदे, काँग्रेसचे अक्षय गोरंट्याल ,रमेशजी देहेडकर, उपविभागीय अधिकारी श्री. अनंत कुलकर्णी, कदिम चे पोलीस निरीक्षक श्री सिध्दार्थ माने,सुभाष देविदान,जयंत बुरा,सुभाष देठे,मिलिंद सावंत,मधुकर घेवंदे, महावीर ढक्का,किशोर गरदास,रमेश गोरक्षक, पिंटू रत्नपारखे,अशोक भगत, धर्मा खिल्लारे,अरुण सरदार,गणेश राऊत,जयंत बूरा,प्रमोद आल्हट,जय खरात, विनोद यादव, शिवप्रसाद चीतलकर,यांच्या सह शेकडो तरुण युवा कार्यकर्ते,महिला भगीनी शीतल ताई तनपुरे,मंगल खांडेभराड, मंदा पवार,कपिल भाऊ खरात,आदी मोठ्या संख्येने महिला पुरुष उपस्थित होते.



## लोकशाही दिनाचे २ डिसेंबर रोजी आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन महिन्याचे पहिल्या सोमवारी करण्याबाबत निर्देश आहेत. जिल्ह्यात दि. २ डिसेंबर, २०२४ सोमवार रोजी सकाळी ठिक १०.०० ते १२.०० वाजेपर्यंत लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. लोकशाही दिनाकरीता अर्जदार यांनी अर्ज विहीत नमुन्यात १५ दिवस आधी २ प्रतीत पाठवणे आवश्यक आहे. या लोकशाही दिनामध्ये अर्ज देतांना त्यांनी संबंधित तालूक्यातील तिसऱ्या सोम वारी तालुकास्तरीय लोकशाही दिनामध्ये अर्ज दिलेला असावा. तसेच तालुकास्तरीय लोकशाही दिनात एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊन देखील कोणतीही कार्यवाही झाली नाही अशाच अर्जदाराने टोकन क्रमांकाच्या पावतीसह विहीत नमुन्यात दोन प्रतीमध्ये अर्ज सादर करावा. तसेच ज्या अर्जदाराने तालुकास्तरीय लोकशाही दिनात भाग घेतला नाही, अशा अर्जदाराचे अर्ज स्वीकारले जाणार नसल्याचे जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांनी कळविले आहे. कोणत्याही स्तरावर लोकशाही दिनात खालील बाबींशी संबंधित अर्ज स्वीकारले जाणर नाहीत. न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व, अपील, सेवाविषयक आस्थापना विषयक बाबी, विहीत नमुन्यात नसणारे व त्यासोबत आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रती न जोडलेले अर्ज, तालुकास्तरीय लोकशाही दिनातील टोकन क्रमांकाशी तसलीदार यांच्या स्वाक्षरीची पोच पावती तसेच त्यासाठी दिलेल्या मुदती व नमुन्यात ज्यांनी यापूर्वीच्या आवश्यक कागदपत्रासह अर्ज केले असतील त्यांना तक्रार मांडता येईल. ज्यांनी त्यापुर्वी जिल्हास्तरावरील लोकशाही दिनी तक्रार अर्ज दिलेला आहे. परंतु अद्याप कार्यवाही झालेली नाही, अशा तक्रारदारांनी पुन्हा अर्ज करु नये. तसेच लोकशाही दिन विहीत नमुन्याचा अर्ज हीींःक्षिरश्रपर. ाळल.ळप या संकेस्थळावर उपलब्ध असल्याचे उपजिल्हाधिकारी (सामान्य) नम्रता चाटे यांनी कळविले आहे.

## परतूर पोलिसांनी मोटार सायकलसह चोरी करणाऱ्यास घेतले ताब्यात

**परतूर । प्रतिनिधी -** परतूर पोलिसांनी काल रात्री गोपनीय माहिती च्या आधारे एकाला केली अटक. माणिक महातारबा पवार वय १९ वर्ष व दुसरा गणपत वाघ्या पवार हा फरार आहे. दोन्ही रा. पारधी वस्ती परतूर याचे ताब्यात चोरीच्या २ मोटार सायकल मिळून आल्या आहेत, त्यापैकी एक परतूर येथून चोरी केलेली आणि एक घनसावंगी येथून चोरी केलेली अशा २ मोटार सायकल मिळून आल्या आहेत, तसेच २ मोटार सायकल परतूर येथे बेवारस स्थितीत मिळून आल्या आहेत. त्यापैकी मिरभाईंदर मुंबई येथील आणि बनगार्डन पुणे येथील असल्याचे समजले आहे. समधित पोलिस स्टेशन येथे कळवून कारवाई केली आहे. परतूर शहरासह परिसरात मोटार सायकल चोरी करणाऱ्या अट्टल गुन्हेगारास परतूर पोलिसांनी मुद्देमालासह शीताफिने अटक केली असून या आरोपीने दोन मोटार सायकल चोरल्याचे कबुल केले आहे.

आरोपींकडून आणखी काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे. सदरची कारवाई ही पोलीस अधीक्षक,अजय पोलीस निरीक्षक, एम.टी.सुरवसे. पोलीस उपनिरीक्षक, विठ्ठल केंद्रे. पोलीस कॉन्स्टेबल,सतीश जाधव.



कुमार बंसल.अप्पर पोलीस अधीक्षक, आयुष नोपाणी.उपविभागीय पोलीस अधिकारी,चौरे यांच्या मार्गदर्शनाखाली दीपक आडे. अच्युत चव्हाण.गोविंद पवार.धर्मा शिंदे. चालक धोत्रे यांनी यशस्वी केली आहे.

## संविधान दिन उत्साहात साजरा

**जालना । प्रतिनिधी** - भारतीय संविधान दि.२६ नोव्हेंबर, १९४९ रोजी स्वीकृत करुन दि.२६ जानेवारी, १९५० पासून संविधानाची अंमलबजावणी सुरु झाली. त्यामुळे २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून साजरा करण्याच्या शासन निर्दे शानूसार दि. २६ नोव्हेंबर २०२४ रोजी समाज कल्याण कार्यालयात संविधान दिन कार्यक्रम उत्साहात पार पडला.

अनुसूचित जाती व नवबौध्द मुलींची शासकीय निवासी शाळा, जालना येथील प्रवेशित विद्यार्थीनीच्या रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीचे उद्धाटन सहायक आयुक्त अनंत कदम यांच्या हस्ते झेंडा दाखवुन सकाळी ९ वाजता करण्यात आली. रॅलीमध्ये शासकीय निवासी शाळेतील विद्यार्थीनी, मुख्याध्यापक, शिक्षक तसेच समाज कल्याण कार्यालयातील सर्व कर्मचारी उपस्थित होते. तर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, जालना येथे सकाळी १० वाजता विद्यार्थीनीची रॅली, शहरातील जेष्ठ नागरीक, कार्यालयातील गुलाब चव्हाण, आतिश ससाणे, इतर कर्मचारी तसेच म हामंडाळील सर्व कर्मचाऱ्यांनी उत्स्फुर्त सहभाग नोंदविला. कार्यक्रमास मत्स्योदरी महाविद्यालयाचे डॉ. विजयकुमार कुमटेकर यांनी संविधानातील कलमे व त्याच्य वापराबाबत विचार मांडणी करत संविधान देशातील प्रत्येक नागरिकासाठी महत्वाचे कसे आहे, याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. असे प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.